गुरुवार, दि. ११ डिसेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १०८ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# आ. खोतकरांकडून विधानसभेत शहर विकासाच्या मुद्यांवर लक्षवेधी

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर व परिसराच्या विविध विकासाच्या मुद्यावर आ.अर्जुन खोतकर यांनी बुधवारी विधानसभेमध्ये अध्यक्षांचे लक्ष वेधले. यावेळी शहरातील झोपडपट्टीवासियांना देण्यात येणारे पीआर कार्ड, ५५ एमएलडीचा वाढीव पाणी पुरवठा यासह मोकाट कुत्रे, कुंडलिका-सीना नदीला सुरक्षा भिंत बांधणे, गुन्हेगारीवर आळा घालणे, कामगारांचा मुद्या यासह अन्य विकासाचे मुद्दे खोतकरांनी प्रभावीपणे मांडले. यामध्ये प्रामुख्याने वाढते शहरीकरण लक्षात घेऊन आज ४२ अधिकृत झोपडपट्टी भागात राहणाऱ्या नागरिकांना पीआर कार्ड देण्यासाठी सर्वेक्षण सुरू असले तरी आणखी ४० झोपडपट्ट्यांमधील नागरिकांनाही पीआरकार्ड देण्यात यावे. जालना शहर हे उद्योग आणि व्यापाऱ्यांचे शहर ओळखले जाते. या उद्योजकांकडून मोठ्या प्रमाणावर जीएसटीची वसूली होते. त्यातील काही हिस्सा हा जालना महानगरपालिकेवर मिळणे अपेक्षित आहे. त्यानुसार




गेल्या वर्षी ९३ कोटी रूपये मंजुर झाले होते, परंतु अद्यापही ते पैसे मिळालेले नाहीत. जालना शहरातील मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर नाट्यगृह तसेच महात्मा फुले मार्केटचा मुद्दा, जलजीवन मिशनची कामे तातडीने पूर्ण करणे यासह अन्य मुद्दे मांडले. यासाठी याआधी देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजीत पवार यांनी बैठका घेतल्या खऱ्या, परंतु हे प्रश्न अद्यापही प्रलंबीत आहे. त्यावरही लक्ष देण्याची मागणी खोतकरांनी केली.

गुन्हेगारी संदर्भात बोलताना जालना शहरातील मातंग तरूणाच्या खून प्रकरणी आरोपींवर मोक्काची कारवाई करावी, तसेच त्यांनी जालना एमआयडीसीतील कामगारांच्या मुद्यावर लक्ष वेधले. एलजीबी ही परराज्यातील **पान २ वर**

# स्वच्छता उपक्रमात नागरिकांनी सहभागी व्हावे - जिल्हाधिकारी

**जालना । प्रतिनिधी -** आठवड्यातील प्रत्येक शुक्रवारी श्रमदान मोहीमेच्या माध्यमातून जालना शहर स्वच्छ व सुंदर राखण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या स्वच्छता उपक्रमात नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जालना शहर महानगरपालिका आयुक्त आशिमा मित्तल यांनी केले आहे. शुक्रवार दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता या उपक्रमांतर्गत मामा चौक, महावीर चौक,जिंदल मार्केट, अलंकार टॉकीज, सिंधी बाजार, खवा मार्केट,सुभाष रोड, मुख्य मार्केट,महेंद्र एजन्सी या परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. स्वच्छता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचा सहभाग महत्त्वाचा आहे. घनकचरा निर्मिती कमी करणे, कचरा segregate करून देणे, प्लास्टिकचा



कमी वापर करणे आणि सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणे ही प्रत्येकाची वैयक्तिक जबाबदारी आहे. स्वच्छता अभियान अधिक प्रभावी करण्यासाठी महापालिका, विविध सामाजिक संस्था, शाळा- महाविद्यालये, नागरिकांनी या उपक्रमात मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जालना शहर महानगरपालिका आयुक्त आशिमा मित्तल यांनी केले आहे.

**- ज्येष्ठ नेते शरद पवारांच्या नवी दिल्लीतील निवासस्थानी अजित पवार यांच्यासह देशभरातील बडे नेते, खासदार एकवटले आहेत आणि त्याला निमित्त ठरलंय ते म्हणजे त्यांचा वाढदिवस. येत्या १२ डिसेंबर रोजी शरद पवारांचा वाढदिवस साजरा केला जाणार आहे. मात्र त्या दिवशी शरद पवार हे मुंबईत येणार असल्याची शक्यता आहे. म्हणून दिल्लीतील निवासस्थानी त्यांनी खासदारांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आलं आहे. या स्नेहभोजनासाठी उद्योगपती गौतम अदानीही उपस्थित राहिले आहेत**

युवा आदर्श

## दिल्ली वारी ...

सर्व पक्षीय करी
पहा दिल्ली वारी
त्रिविधैक्य स्वामी
तिथे खरा कैवारी
सकलजन जाणी
तेचं ठरवे अश्वारी
मुहूर्त तूर्त तिथूनि
कधीकरता स्वारी
होय शिक्केमोर्तब
कुणाले उमेदवारी
पडझड थांबवाया
करायची उस्तवारी
तेचं जाणे डावपेच
अतिपक्के जुवारी
लपंडाव चाललेला
राज्य ये कुणा वरी
सांभाळी खातेवही
अव्वल ते पटवारी
सौद्या हवा फायदा
मुरलेले रे व्यवहारी
चाणाक्ष रे चाणाक्य
महान रत्न दरबारी
मानयंदास कुणाला
तिथेचं सजे अंबारी
लग्न जमे तरूणीचे
म्हातारी राहे कुवारी
निर्णय तिथेचं होती
भले लागो जिव्हारी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# दोन अल्पवयीन मुलींना पोलीसांनी सुखरुप घरी परत आणल्याने नातेवाईकांनी पोलीस अधिक्षकांचे मानले आभार

**जालना । प्रतिनिधी -** तब्बल नऊ दिवसांपासून हरवलेल्या बदनापूर येथील १४ वर्षांची आणि मांजरगाव येथील १५ वर्षांची अशा दोन मुलींचा शोध लावून त्यांना सुरक्षितपणे पालकांच्या ताब्यात सुपूर्त करण्याची उल्लेखनीय कामगिरी बदनापूर पोलिसांनी केली आहे.

१ डिसेंबर रोजी दोन्ही मुली घरच्यांना न सांगता बाहेर पडल्या. सकाळी शाळेत जात असतांना घरी सांगितले की आज शाळेत कार्यक्रम आहे घरी येण्यासाठी उशार होईल असे सांगून शाळेत गेल्या होत्या नंतर संध्याकाळी ५ वाजेपर्यंत दोघीही घरी परतल्या नसल्याने घरातील लोकांना त्यांची शोधा शोध घेतला असता त्या दोघीही मिळून आल्या नाहीत. त्याचा रात्री उशीरा पर्यंत शोध घेतला असता त्या मिळून न आल्याने पालकांनी पोलिस स्टेशनमध्ये त्या हरविल्या बाबतची तक्रार दाखल केली होती.

प्रकरण गंभीर असल्याचे लक्षात घेऊन पोलिस निरीक्षक एम. टी. सुरवसे यांनी तत्काळ लहान मुलींना पळवून नेल्याचा गुन्हा नोंदवून तीन स्वतंत्र पथकांमार्फत व्यापक शोध मोहीम राबवली. एक पथक बिहार-उत्तर प्रदेश-नेपाळ, दुसरे मुंबई आणि तिसरे स्थानिक परिसरात असे विभाजन करण्यात आले. दरम्यानच्या काळात आपला घरातील लोकांना शोध घेता येऊ नये यासाठी मुलीनी आपलेकडे



असलेले मोबाईल व सिम कार्ड बंद केले होते. परंतू जेथे भेटले तेथे इन्टनेटचा उपयोग करुन त्या हरीरिं चालू करत होत्या सदर मुली या बदनापूर हून जालना, मुंबई, जैननगर (बिहार), जनकपुर (नेपाळ) असा अंदाजे २००० किलोमिटर प्रवास करुन नेपाळ मध्ये पोहचल्या नेपाळ मध्ये दोन दिवस मुक्काम करुन जनकपुर परीसर, जानकीमंदिर इत्यादी परीसराला भेट देऊन फिरत असतांना जनकपुर नेपाळ येथील रेल्वे स्टेशनवरील त्यांनी इन्टरनेट वापरल्याचे तांत्रीक तपासात निष्पन झाल्याने मा. आयुष नोपाणी, अपर पोलीस अधिक्षक साहेब जालना यांनी बिहार तसेच नेपाळ येथील पोलीसांशी संपर्क साधून मुलीबाबतची माहिती घेऊन त्याठिकाणी एक पथक तात्काळ रवाना केले. दरम्यान सदर मुलींनी नेपाळ सोडून पुन्हा रेल्वेने मुंबईला येत असतांनी अदित्य झा नावाच्या प्रवाशींची त्यांची ओळख झाली होती तेव्हा रेल्वे प्रवासात त्यांनी अदित्य झा यास विनंती केली की त्यांना मुंबई मध्ये भाड्याने रुम पाहिजे आहे तेव्हा त्याने त्यांना रुम करुन देतो असे सांगितले होते. त्याच वेळी त्यांचे इन्टरनेट सुध्दा मुलींनी वापरले होते. त्या दरम्यान तांत्रीक तपास करुन मुलीं ह्या पवन एक्सप्रेस रेल्वेने जैननगर येथून ठाणे येथे येत असल्याची माहिती मिळाली त्याप्रमाणे ठाणे कळवा येथे दुसरी पोलीस टिम रवाना केली असता मुंबई कळवा येथे दोन्ही मुली सुखरुप मिळून आल्या त्यांना ताब्यात घेऊन त्यांना त्यांचे नातेवाईकांचे ताब्यात देण्यात आले आहे.

आज रोजी मुली आपल्या घरी सुखरुप आल्या याबाबत मुलींचे नातेवाईक यांना विश्वास बसत नव्हता पोलीस स्टेशन बदनापूर येथे येऊन पेठे वाटप केले व पोलीसांचे आभार मानले तसेच या मुलींच्या शोध मोहिमेमध्ये मा. श्री अजय कुमार बन्सल, पोलीस अधिक्षक साहेब जालना व मा. श्री आयूष नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक साहेब जालना यांचा सुध्दा मोलाचा वाटा असल्याने त्यांचे सतिश आरसुळ, बद्रीनाथ आरसुळ, सिध्देश शेळके, डॉ रामेश्वर पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन आभार मानले

या संपूर्ण कार्यवाहीत अजय कुमार बन्सल, पोलिस अधीक्षक, जालना, आयुष नोपाणी, अप्पर पोलिस अधीक्षक, अनंत कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधिकारी, जालना यांचे मार्गदर्शनाखाली पो. नि. एम. टी. सुरवसे यांच्यासोबत महिला सपोनि स्नेहा करेवाड, पोउपनि अजय जैस्वाल, पो.का गोपाळ बरवाल, पो.का. परमेश्वर ढगे, पो. का अनिल पिल्लेवाड, पोहेका सागर बाविस्कर, पो.का. संदीप मांठे यांनी मेहनत घेतली.

# विष्णुनगर पोलीस ठाणेची उल्लेखनिय कामगिरी

**डोंबिवली -** चार लाख रुपये किमतीचे गऱ्हाळ व चोरीचे २६ मोबाईल फोन परत विसरलेले, गऱ्हाळ व चोरीचे असे पोलीस ठाण्यात तक्रार नोंद झालेले चार लाख रुपये किमतीचे मोबाईल पोलिसांनी तपास करून शोधले. तक्रारादार यांना मंगळवार ८ तारखेला विष्णूनगर पोलिसांनी परत केले.आपले मोबाईल परत मिळाल्याबद्दल तक्रारदारांनी पोलिसांचे आभार मानले. कल्याण परिमंडळ - ३ पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस आयुक्त डोंबिवली विभाग सुहास हेमाडे यांच्या आदेशानुसार विष्णूनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीराम चोपडे व पोलिस शिपाई रोहिदास शिंदे व पथकाने सायबर सायबर गुन्हेतील गऱ्हाळ झालेले व चोरी झालेले मोबाईल शोधण्यास यश आले. पोलीस शिपाई रोहिदास शिंदे यांनी सुमारे २५० मोबाईल शोधले असून त्यांच्या या कामाचे पोलीस उपायुक्त कल्याण परिमंडळ - ३ अतुल झेंडे, सहायक पोलीस आयुक्त सुहास हेमाडे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीराम चोपडे यांनी त्यांचे कौतुक केले. तर तक्रारदार सामाजिक व महिला सक्षमीकरण अभियान महाव्यवस्थापक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कारप्राप्त डॉ. अमित दुखंडे यांना पत्रकारांनी विचारले असता ते म्हणाले, पोलिसांचे हे काम कौतुकास्पद आहे.

## विजयस्तंभ, भीमा-कोरेगाव येथे हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टीसाठी परवानगी मागणी

**पुणे -** १८१८ मधील ऐतिहासिक भीमा-कोरेगाव लढाईत शौर्याने लढलेल्या ५०० महार सैनिकांच्या पराक्रमाला अभिवादन करण्यासाठी दि. ०१ जानेवारी २०२६ रोजी विजयस्तंभावर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यास परवानगी देण्याची मागणी आज 'लष्कर ए भीमा' संघटनेतर्फे पुणे पोलीस आयुक्त कार्यालयात उद्योजक संग्राम सिंग टाक व त्यांच्या सहकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आली. या संदर्भात संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सचिनभाऊ दिवार, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तेजचंद्रसिंग अहलूवालिया, महाराष्ट्र सरचिटणीस बाबासाहेब नागटिळक, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षा (आरोग्य) साधना ताई मिसाळ, पुणे शहराध्यक्षा छाया ताई कांबळे आणि पुणे शहराध्यक्ष विशालभाऊ साळवे यांनी आयुक्तांना निवेदन सादर केले. सालाबादप्रमाणे संघटनेतर्फे यंदाही हा उपक्रम सन्मानपूर्वक पार पाडण्यासाठी परवानगी देण्याची मागणी करण्यात आली आहे.

# पोलिसांना आता वॉरंट बजावावेच लागेल; आरोपी पळाला म्हणून सांगून चालणार नाही

**जालना । प्रतिनिधी -** अजामीनपात्र वॉरंट केवळ दोनच परिस्थितीत अमलबजावणी होत नाहीः एकतर जेव्हा आरोपी मृत झाला असेल किंवा तो देश सोडून पळून गेल्याचे ठोस पुरावे असतील, असा महत्त्वपूर्ण निरीक्षण अलाहाबाद उच्च न्यायालयाने नोंदवले. आहे. या निकालामुळे देशभरातील वॉरंट बजावणी प्रक्रियेवर दूरगामी परिणाम होणार असून, पोलीस प्रशासनाला आता फरार आरोपींना शोधून काढण्यापासून पळ काढता येणार नाही. या पार्श्वभूमीवर बोलताना नोटरी असोसिएशनचे जिल्हा कार्याध्यक्ष अॅड. महेश धन्नावत यांनी जालना आणि महाराष्ट्रातील गंभीर परिस्थितीवर बोट ठेवले आहे.

अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे. जे. मुनीर आणि न्यायमूर्ती संजीव कुमार यांच्या खंडपीठाने १९८४ च्या एका फौजदारी अपिलावरील सुनावणीदरम्यान हे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले. मौलाना खुर्शीद जमील विरुद्ध उत्तर प्रदेश सरकार या खटल्यात, ४१ वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला शोधण्यात अपयश आल्याचा अहवाल प्रयागराज पोलीस आयुक्तांनी सादर केला होता, जो न्यायालयाने फेटाळून लावला. फरार आरोपी देशाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात लपला असला तरी त्याला शोधून काढणे हे पोलिसांचे कर्तव्य आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

या निकालावर प्रतिक्रिया देताना ड. महेश धन्नावत म्हणाले, अलाहाबाद उच्च न्यायालयाचा हा निरीक्षण अत्यंत स्वागतार्ह आणि महत्त्वाचा आहे. विशेषतः महाराष्ट्रात आणि जालना जिल्ह्यात चेक बाऊन्सच्या (धनादेश अनादर) प्रकरणात परिस्थिती अत्यंत बिकट झाली आहे. न्यायालये आरोपींविरुद्ध हजारो अजामीनपात्र वॉरंट जारी करतात, परंतु पोलीस प्रशासनाकडून त्याची प्रभावीपणे बजावणीच होत नाही. आरोपी मोकाट फिरत राहतात आणि कायद्याचा धाक उरलेला नाही.

अॅड धन्नावत पुढे म्हणाले, वॉरंटची बजावणी होत नसल्याने अनेक फिर्यादी निराश झाले आहेत. त्यांना न्यायव्यवस्थेवरील विश्वास उडत चालला आहे. दुर्दैवाने, पैसे वसूल करण्यासाठी आता लोक न्यायालयाऐवजी गुंड आणि खाजगी वसुली एजंटची मदत घेऊ लागले आहेत. ही एक अत्यंत धोकादायक सामाजिक प्रवृत्ती आहे आणि कायद्याच्या राज्यासाठी मोठा धोका आहे. जर पोलीस यंत्रणा सक्रिय झाली आणि न्यायालयाने जारी केलेले वॉरंट गांभीर्याने बजावले, तर लोकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास टिकून राहील आणि त्यांना अशा बेकायदेशीर मार्गांचा अवलंब करावा लागणार नाही. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या या निकालाची अंमलबजावणी देशभरात कठोरपणे व्हायला हवी, जेणेकरून फरार आरोपींना कायद्याच्या चौकटीत आणता येईल.

मौलाना खुर्शीद जमाल कादरी नावाच्या आरोपीला १९८४ मध्ये एका फौजदारी प्रकरणात जामीन मंजूर झाला होता. मात्र, त्यानंतर तो फरार झाला. अनेक दशकांनंतर जेव्हा हे प्रकरण सुनावणीसाठी आले, तेव्हा तो सापडला नाही. न्यायालयाने त्याच्याविरुद्ध फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ८२ अंतर्गत फरारी घोषित करण्याची प्रक्रिया सुरू केली. पोलिसांनी सादर केलेल्या अहवालात म्हटले होते की, आरोपीचे दोन्ही जामीनदार मरण पावले आहेत आणि बिहारमधील त्याच्या मूळ पत्त्यावरही तो सापडला नाही. मात्र, न्यायालयाने हा अहवाल असमाधानकारक ठरवत पोलिसांच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आणि आरोपीला ११ डिसेंबरपर्यंत न्यायालयात हजर करण्याचे निर्देश दिले.

# संपादकीय पान

## ट्रॅजीडी किंग, अभिनय सम्राट

ट्रॅजीडी किंग म्हणून ओळखले जाणारे हिंदी चित्रपट सृष्टीतील भीष्माचार्य दिलीपकुमार यांची आज जयंती. ११ डिसेंबर १९२२ रोजी दिलीपकुमार यांचा जन्म पेशावर येथे झाला. त्यांचे मूळ नाव मोहम्मद युसूफ खान असे होते. पेशावरहून त्यांचे कुटुंब उदरनिर्वाहासाठी म ुंबईत आले. दिलीपकुमार यांच्यासह बारा भावंडे होते. त्यांच्या कुटुंबात पाहुण्यांचाही राबता होता त्यामुळे आपणही काही तरी काम करून घर खर्चास मदत करावी असा विचार करून दिलीपकुमार पुण्याला आले. तिथे त्यांनी लष्करी कँटीनमध्ये मॅनेजरचा सहाय्यक म्हणून काम केले. दुसऱ्या महायुद्धात लष्करी कँटीनचे व्यवस्थापन बदलले आणि दिलीपकुमार जमा केलेले पाच हजार रुपये घेऊन घरी परत आले. मुंबईला आल्यावर त्यांना पुन्हा नोकरी शोधावी लागली. दिलीपकुमार हे नोकरीच्या शोधात आहे हे त्यांचे परिचित डॉ मसानी यांना समजले तेंव्हा डॉ मसानी यांनी त्यांना माहीम येथील बॉम्बे टॉकीजच्या स्टुडिओमध्ये देविका राणी यांच्याकडे घेऊन गेले. देविका राणी यांनी दिलीपकुमार यांचे राजबिंडे व्यक्तिमत्त्व आणि उर्दूवरील पकड पाहून त्यांना महिना बाराशे रुपये पगारावर अभिनय करण्याची ऑफर दिली. वास्तविक हा प्रस्ताव दिलीपकुमार यांना मान्य नव्हता कारण चित्रपटात अभिनय करावा असा विचार त्यांनी कधीही केला नव्हता पण महिना बाराशे रुपये मिळतात ही रक्कम त्याकाळी खूप मोठी होती त्यामुळे त्यांनी हा प्रस्ताव स्वीकारला आणि देशाला एक महान अभिनय सम्राट मिळाला. देविका राणी यांनीच त्यांना दिलीपकुमार हे नाव दिले. १९४४ साली आलेल्या ज्वार भाटा या चित्रपटाद्वारे दिलीपकुमार यांनी आपल्या चित्रपट कारकिर्दीला सुरवात केली. १९४४ ते १९९८ पर्यंत म्हणजे सहा दशकापेक्षा अधिक काळ दिलीपकुमार यांनी आपल्या अभिनयाने गाजवून सोडला. या दरम्यान त्यांचे अनेक चित्रपट सुपरहिट झाले. यात त्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका केल्या. अंदाज, राम और श्याम, आन, देवदास, आझाद, मुगल - ए - आझम, गंगा जमुना, नया दौर हे त्यांचे चित्रपट तर सुपरहिट झाले. या चित्रपटांनी तरुणाईला वेड लावले. १९५७ साली आलेल्या गंगा जमुना या चित्रपटातील मांग के साथ तुम्हारा...मैने मांग लिया संसार....या गाण्याने तरुणाईला वेड लावले होते. या चित्रपटात वैजयंती माला या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट रसिक त्यांच्या अभिनयाने इतके भारावले होते की त्याकाळच्या तरुणांचे ते आयडॉल बनले. देवदास या चित्रपटातील त्यांची भूमिका ही तर त्यांच्या कारकिर्दीतील मैलाचा दगड ठरली. त्यांच्या या चित्रपटातील भूमिकेचे नंतर अनेक अभिनेत्यांनी अनुकरण केले पण कोणालाही त्यांच्या अभिनयाच्या जवळपास पोहचता आले नाही. १९७६ साली आलेला बैराग हा चित्रपट त्यांचा नायक म्हणून शेवटचा चित्रपट ठरला या चित्रपटात त्यांनी तिहेरी भुमीका साकारली. त्यानंतर काहीकाळ ब्रेक घेऊन त्यांनी मनोज कुमार यांच्या क्रांती या चित्रपटापासून चरित्र अभिनेता म्हणून काम करण्यास सुरुवात केली. शक्ती, विधाता, मजदूर, दुनिया, मशाल, कर्मा या चित्रपटात त्यांनी चरित्र भूमिका केल्या. सुभाष घई यांच्या सौदागर या चित्रपटात राजकुमार यांच्यासोबत त्यांची जुगलबंदी चांगलीच गाजली. १९९८ साली आलेला किला हा त्यांनी अभिनय केलेला शेवटचा चित्रपट ठरला. या दरम्यान त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. सर्वो त्कृष्ट अभिनयासाठी दिलीपकुमार यांना आठ पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांच्या अभिनय कारकिर्दीची योग्य दखल घेऊन पद्मभूषण, पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने त्यांना गौरवले. हिंदी चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च असा दादासाहेब फाळके पुरस्कारानेही त्यांना गौरविण्यात आले. पाकिस्ताननेही त्यांना निशान - ए - इम्तियाज या त्यांच्या सर्वोच्च पुरस्काराने गौरवले आहे. ७ जुलै २०२१ रोजी वयाच्या ९८ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे दुःखद निधन झाले. दिलीपकुमार यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीचेच नाही तर देशाचे मोठे नुकसान झाले. दिलीपकुमार यांच्या निधनाने अभिनयातील भीष्माचार्य काळाच्या पडद्याआड गेला. त्यांचा सारखा अभिनेता पुन्हा होणार नाही. अभिनयातील भीष्माचार्य, अभिनय सम्राट दिलीपकुमार यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

### पान १ वरुन

## आ. खोतकरांकडून ...

कंपनी असतांनाही या कंपनीमध्ये स्थानिक कामागारांना प्राधान्य दिले जात नाही. ज्या ठिकाणी ही कंपनी आहे त्यासाठी जमिनी दिलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांनाही रोजगार उपलब्ध होत नाही. या प्रकरणी जिल्हा सरकारी काम गार अधिकाऱ्यांचे साफ दुर्लक्ष असल्याची बाबही त्यांनी निदर्शनास आणुन दिली.

**सिडकोचा अन्य शेतकऱ्यांना मावेजा द्यावा**

जालना शहरानजिक पाच ते सात वर्षांपूर्वी सिडकोचा गृहप्रकल्प उभारणीसाठी जमिनी संपादित केले आहेत. त्यातील ५० टक्के शेतकऱ्यांना मावेजा दिलेला आहे. उर्वरित मावेजाची रक्कम त्या भागातील शेतकऱ्यांना द्यावी, या म ुद्यावरही खोतकरांनी बाजू मांडली.

# वैदिक धर्म, राष्ट्रधर्म आणि 'शंखनाद महोत्सवा'चे महत्त्व!

सनातन वैदिक धर्म हा भारताचा आत्मा आहे, आणि राष्ट्राच्या अस्तित्वाचा खरा आश्रयही तोच. यतो अभ्युदय निश्रेयस सिद्धीः स धर्मः ही भारतीय तत्त्वज्ञानाची दिव्य व्याख्या आहे. जी जीवनाच्या दोन्ही पातळ्यांना संतुलित करतेः लौकिक उन्नती आणि परमकल्याण. जगात अनेक विचारसरणी उदयास आल्या, काही प्रभावी ठरल्या, काही लयास गेल्या; परंतु मानवी जीवनाचे अंतिम उद्दिष्ट काय आहे, हे सांगण्याची स्पष्टता केवळ सनातन धर्माकडेच आहे. म्हणूनच भारत हे केवळ भूभागाचे नाव नसून एक सर्वश्रेष्ठ संस्कृती, एक जीवन जगण्याची तेजस्वी परंपरा, अविनाशी धर्मजीवन आहे. म्हणूनच भारत एक शाश्वत आध्यात्मिक राष्ट्र आहे.




जगातील ग्रीक, रोमन, झारची रशिया ही प्रबळ साम्राज्ये वेळोवेळी उभी राहिली आणि नष्ट झाली. परंतु भारत आजही तितक्याच सामर्थ्याने उभा आहे, कारण या राष्ट्राचे अस्तित्व राजकीय बांधणीत नसून, लोकांच्या मनातील संस्कृती, श्रद्धा, धर्मनिष्ठ मूल्ये, आणि पवित्र परंपरांमध्ये आहे. राम, कृष्ण, शिव, गाय, गंगा, मातृभूमी या सर्वांविषयीची अनुभूती आजही भारतीयांच्या चेतनेत आहे अन् हृदयामध्ये धडधडते. म्हणूनच भारत अविनाशी आहे. राष्ट्राला नष्ट करायचे अनेक प्रयत्न झाले; मात्र अवतार, संत राष्ट्रपुरुष यांनी वेळोवेळी भारताचे रक्षण केले हा इतिहास दाखवतो; आणि म्हणूनच भारताच्या धर्मजीवन, भावजीवनाचे रक्षण म्हणजे धर्मरक्षण !

आज भारत तांत्रिक, सामरिक आणि अर्थकारणात झपाट्याने पुढे जात असला, तरी दहशतवाद, नक्षलवाद, सांस्कृतिक विघातकता, अतिरेकी विचारसरणी आणि आंतरिक फूट यांसारखी अनेक आव्हाने समोर आहेत. केवळ राजकीय धोरणांनी किंवा मतांसाठी झुकणाऱ्या धर्मनिरपेक्षतेने राष्ट्र सुरक्षित राहणार नाही. राष्ट्राला जीवंत ठेवणारी शक्ती म्हणजे धर्माधिष्ठित जीवनमूल्ये, साधकता, शौर्य आणि सामाजिक बांधिलकी. म्हणूनच भारतीय राष्ट्रपुनरुत्थानाचा मार्ग सनातन धर्मातूनच जातो, हे योगी श्रीअरविंदांनी स्पष्ट केले होते.

या पार्श्वभूमीवर दिल्लीतील 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' हा केवळ सांस्कृतिक कार्यक्रम नसून राष्ट्रचेतनेचे पुनरुज्जीवन करणारा ऐतिहासिक सोहळा आहे. १३ आणि १४ डिसेंबर २०२५ रोजी भारत मंडपममध्ये होणाऱ्या या महोत्सवात संरक्षण, संस्कृती, समाजजीवन, राष्ट्रीय सुरक्षा, परंपरा आणि तत्त्वज्ञान यांच्यातील संबंधांवर अभ्यासपूर्ण चर्चा होणार आहे. २५० हून अधिक विविध प्रकारची शिवकालीन शस्त्रप्रदर्शनी, पारंपरिक युद्धकलेचे प्रात्यक्षिक, विशेष तज्ज्ञांचे मार्गदर्शन, संत-महंतांची प्रेरणा आणि 'विश्वकल्याणकारी सनातन राष्ट्र' या विषयावरचे सखोल सत्र, हे सर्व राष्ट्राला नवीन दिशा देणारे ठरणार आहे.

महाभारतात श्रीकृष्णांनी जसा धर्मयुद्धासाठी शंखनाद केला, तसा आजचा हा महोत्सवही भारताला धर्माधिष्ठित, सुरक्षित आणि जागृत राष्ट्राकडे नेणारा नवा शंखनाद आहे. प्रत्येक सनातन धर्मीयांनी हा संदेश आत्मसात करून कृतीत



उतरवला, तर हा महोत्सव नवयुगाची, रामराज्याची सुरुवात ठरेल.

**दुर्गेश परुळकर, ज्येष्ठ लेखक तथा व्याख्याते**

# वेश्या व्यवसायावर छापा टाकुन ०८ पुरुष आरोपींना जेरबंद करुन ०४ पीडीत महिलांची केली सुटका

## अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाची कार्यवाही



**जालना । प्रतिनिधी -** अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षास दिनांक ०९/१२/२०२५ रोजी गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर बातमी मिळाली की बसस्टॅन्ड रोड वरील न्यु शिवगंगा लॉज येथे लॉज मालक संदीप पांडुरंग राऊत हे स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी त्यांच्या न्यु शिवगंगा लॉजमधे बाहेरुन महीलांना आणुन त्यांच्याकडुन वेश्या व्यवसाय करीत आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाल्या वरुन सदर माहीती बाबत मा. पोलीस अधिक्षक सो यांच्याशी चर्चा करुन त्यांच्या सुचनेप्रमाणे स्थागुशाचे पोनि.श्री. पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाचे प्रभारी अधिकारी व स्टाफचे अंमलदार यांनी मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी छापा टाकला असता, न्यू शिवगंगा लॉज येथे आरोपी नामे १) न्यु शिवगंगा लॉजचे मालक संदीप पांडुरंग राऊत २) मॅनेजर बाळासाहेब अंकुश जगताप वय ३२ वर्ष रा. घोटन ता. बदनापुर जि. जालना ३) निखील शेषराव हिवाळे वय- २२ वर्ष रा. खासगाव ता. जाफ्राबाद जि. जालना ४) राजु नाना गव्हाड वय २७ वर्ष रा. सिंदखेड राजा जि. बुलढाणा (५) अनिल वामनराव हिवाळे वय २९ वर्ष रा. कुंभारी ता. जाफ्राबाद जि. जालना ६) गणेश भाऊसाहेब ओळेकर वय ३० वर्ष रा. तळनी ता. बदनापुर जि. जालना ७) शिवाजी भाऊराव ओळेकर वय ३० वर्ष रा. तळनी ता. बदनापुर जि. जालना ८) अमोल जगन जंजाळ वय ३० वर्ष रा. कुंभारी ता. जाफ्राबाद जि. जालना असे ०४ पीडीत महीलांसह मिळुन आले असुन त्यांच्या ताब्यात रोख १०१,२७०/-असा मुद्देमाल मिळून आला आहे. त्यानुसार त्यांना ताब्यात घेवुन त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे सदरबाजार येथे महीलांच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध अधिनियम १९५६ कलम ३,४,५,६ प्रमाणे प्रभारी अधिकारी अ.मा.वा.प्र. कक्ष पोउपनि गणेश शिंदे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी जालना अनंत कुलकर्णी, पोलीस निरीक्षक पंकज जाधव (स्थागुशा) यांच्या मार्गदर्शनाखाली अ.मा.वा.प्र. कक्षाचे प्रभारी अधिकारी पोउपनि गणेश शिंदे, पोउपनि रवी जोशी, पोहेकों कृष्णा देठे, महिला अंम लदार संगिता चव्हाण, पुष्पा खरटमल, आरती साबळे, रेणुका राठोड व चालक पोलीस अंमलदार संजय कुलकर्णी यांनी केलेली आहे.

# संत कक्कय्या आर्थिक विकास महामंडळाच्या संदर्भात लवकरच विशेष बैठकीचे आयोजन

**मुंबई । प्रतिनिधी -** वीरशैव कक्कय्या कल्याण मंडळ धारावी मुंबई च्या वतीने सर्व समाज बांधवाना एक विशेष सूचना देण्यात येत आहे की,संत कक्कय्या आर्थिक विकास महामंडळ बाबत विधानसभेत तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घोषणा करून सुद्धा अजूनही जीआर निघत नाही. त्यासाठी २०२५ रोजी दुसरे आंदोलन समाजाच्या वतीने आझाद मैदान येथे करण्यात आले.पण शासकीय यंत्रणात जीआर काढण्याची तयारी दिसून येत नाही. शासन जाणूनबुजून चालढकल करत आहे काय असेच आता वाटू लागले आहे. तेव्हा पुन्हा एकदा शासनाला जागे करण्यासाठी आंदोलन छेडावे लागेल अथवा समाज बांधवाना आमरण उपोषणाला बसावे लागेल याची तयारी अनेक समाज बांधव करीत आहे.

याविषयी सर्व स्तरावर विचारमंथन करण्यासाठी तसेच कक्कय्या कल्याण मंडळाने आखलेल्या पुढील कार्यक्रमांची रूपरेषा आणि त्यावर काय उपाय योजना करता येईल यासाठी येत्या फ ेब्रुवारी महिन्यात एक विशेष महासभा लावण्याचा मंडळाने निर्णय घेतला आहे .
हा निर्णय दिनांक -५/१२/२०२५ रोजी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत झाला.त्या बैठकीमध्ये म हामंडळाचे काय ? या विषयावर चर्चा विनिमय करण्यात आले.यावेळी अध्यक्ष - महादेव कृष्णा शिंदे, उपाध्यक्ष - विश्वनाथ सि. शिंदे,सचिव- यशवंत ब. नारायणकर,प्रवक्ते - रवींद्र रूपचंद शिंदे आणि इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

महाराष्ट्रातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांना महासभेसाठी आमंत्रित करण्यात येणार आहे .या महासभेत महामंडळा विषयी महत्त्वाची भूमिका ठरवण्यात येणार आहे.समाज बांधवाच्या विचारमंतनातून हा निर्णय घेण्यात येणार आहे .तरी समाज वांधवानी फेब्रुवारी म हिण्यात होणाऱ्या महा सभेला मोठया संख्येने उपस्थित रहावे.लवकरच महासभेचे ठिकाण आणि तारीख कळविण्यात येईल याची नोंद घ्यावी असे कक्कय्या कल्याण मंडळाने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.
तसेच या महासभेला सम ाजातील प्रत्येक व्यक्तीला उपस्थित राहता येईल असे मध्यवर्ती ठिकाण निवडावे अशी विनंती वजा सूचना अखिल भारतीय कक्कय्या ढोर समाज विकास मंच चे संस्थापक अध्यक्ष श्री राजकुम ार सोनवणे यांनी केली आहे.

# इंडिगो विमान रद्द झाल्याने फटका बसला? ग्राहक न्यायालयात धाव घ्या!

## जालन्यातील प्रवाशांना ॲड. महेश धन्नावत यांचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** इंडिगो एअरलाइनच्या मनमानी कारभारामुळे हजारो विमानसेवा रद्द झाल्याने प्रवाशांना झालेल्या प्रचंड त्रासाबद्दल दिल्ली उच्च न्यायालयाने तीव्र चिंता व्यक्त केली आहे. न्यायालयाने कंपनीला प्रवाशांना त्वरित नुकसान भरपाई देण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर, ज्या प्रवाशांना इंडिगोच्या या गलथान कारभारामुळे आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागला आहे, त्यांनी आपल्या हक्कांसाठी ग्राहक मंचात तक्रार दाखल करावी, असे आवाहन नोटरी असोसिएशनचे जिल्हा कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी केले आहे.
ॲड. धन्नावत यांनी म्हटले आहे की, दिल्ली उच्च न्यायालयाच्या निरिक्षणांमुळे हे स्पष्ट झाले आहे की, एअरलाइन कंपन्या प्रवाशांना गृहीत धरू शकत नाहीत. विमान रद्द झाल्याने किंवा उशीर झाल्याने प्रवाशांचे आर्थिक नुकसान होते, महत्त्वाच्या कामांमध्ये व्यत्यय येतो आणि प्रचंड मानसिक त्रास होतो. ही थेट सेवा त्रुटी असून, ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ अंतर्गत नुकसान भरपाई मिळवण्याचा प्रत्येक प्रवाशाला अधिकार आहे. जालन्यातील ज्या नागरिकांना याचा फटका बसला आहे, त्यांनी पुढे येऊन तक्रार दाखल करावी.

**काय घडले दिल्ली उच्च न्यायालयात?**

एका जनहित याचिकेवर सुनावणी करताना दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश डी. के. उपाध्याय आणि न्यायमूर्ती तुषार राव गेडेला यांच्या खंडपीठाने इंडिगो संकटामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर तीव्र नाराजी व्यक्त केली.
प्रवाशांना त्वरित नुकसान भरपाई द्याः न्यायालयाने स्पष्ट केले की, विमानतळांवर अडकून पडलेल्या लाखो प्रवाशांना नुकसान भरपाई देण्याच्या नियमांचे इंडिगोने कठोरपणे पालन करावे. नागरी विमान वाहतूक मंत्रालय यांनी याची खात्री करावी. अर्थव्यवस्थेवर परिणामः ही केवळ प्रवाशांच्या गैरसोयीची बाब नाही, तर देशाच्या अर्थव्यवस्थेवरही याचा परिणाम होतो, असे न्यायालयाने नमूद केले.
सरकारला फटकारलेः संकट निर्माण होईपर्यंत सरकार काय करत होते? अशी गंभीर परिस्थिती का उद्भवू दिली? असे प्रश्न विचारत न्यायालयाने केंद्र सरकारलाही धारेवर धरले.
तिकिटांचे वाढलेले दरः संकटाच्या काळात इतर एअरलाइन्सना अव्वाच्या सव्वा दर आकारण्याची परवानगी कशी दिली गेली, यावरही न्यायालयाने बोट ठेवले.
सुनावणीदरम्यान, केंद्र सरकारने सांगितले की, एक उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे आणि इंडिगोला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती, ज्यावर कंपनीने माफी मागितली आहे.
मात्र, संकट उद्भवल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा ते टाळण्यासाठी काय केले, असा सवाल न्यायालयाने उपस्थित केला.
इंडिगोच्या वकिलांनी तांत्रिक बिघाड आणि इतर अनेक कारणांमुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचे सांगितले, परंतु न्यायालयाने स्पष्ट केले की प्रवाशांना झालेल्या त्रासाची भरपाई कंपनीला करावीच लागेल.
या प्रकरणाची पुढील सुनावणी २२ जानेवारी २०२६ रोजी होणार असून, तोपर्यंत चौकशी समितीचा अहवाल सादर करण्याचे निर्दे श न्यायालयाने दिले आहेत.

**जालन्यातील प्रवाशांनी काय करावे?**

ॲड. महेश धन्नावत यांनी सांगितले की, ज्या प्रवाशांचे विमान रद्द झाले, ज्यांना महागडी पर्यायी तिकिटे काढावी लागली किंवा ज्यांना विमानतळावर ताटकळत राहावे लागले, ते सर्व ग्राहक मंचात तक्रार दाखल करू शकतात. तक्रारीसाठी आवश्यक कागदपत्रे जसे की मूळ तिकीट, रद्द झाल्याचा पुरावा, पर्यायी व्यवस्थेसाठी झालेला खर्च इत्यादी पुरावे सोबत ठेवावेत. ग्राहक मंचामार्फत तिकिटाच्या परताव्यासोबतच झालेल्या शारीरिक, मानसिक आणि आर्थिक त्रासासाठीही नुकसान भरपाई मागता येते.

कुक्कडगाव ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचार प्रकरण:

# दोन महिने उलटूनही चौकशी अहवाल नाही

## विस्तार अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**अंबड । प्रतिनिधी -** अंबड तालुक्यातील कुक्कडगाव ग्रामपंचायतीतील कथित भ्रष्टाचाराबाबत दाखल तक्रारीवर चौकशी होऊन दोन महिने उलटूनही चौकशी अहवाल सादर न झाल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. या प्रकरणात ग्राम विकास मंत्री, ग्रामविकास सचिव, विभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद तसेच विविध वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे ऑनलाइन आणि ऑफलाइन असे दोनही मार्ग वापरून तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या.

अनेक तक्रारी दाखल झाल्या नंतर शेवटी जालना जिल्हा परिषद ने तक्रारीची दखल घेत जालना जिल्हा परिषदेच्या मुख्याधिकारी मित्रू पी. एम. यांनी अंबड पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना चौकशी करण्याचे आदेश दिले. पुढे गटविकास अधिकाऱ्यांनी तपासाची जबाबदारी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी चव्हाण यांच्याकडे सोपवल्या नंतर पंचायत समिती विस्तार अधिकारी यांनी दिनांक ८ ऑक्टोबर २०२५ रोजी जा. क्र. पं. च. अ./पंचा-२/कवि/२०२५ असा अधिकृत पत्रव्यवहार करून तक्रारदार व संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना नोटीस देण्यात आली.यानुसार ९ ऑक्टोबर २०२५ रोजी विस्तार अधिकारी चव्हाण यांनी ग्रामपंचायत कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून एका जागेवर बसून पंचनामा केला. आवश्यक ग्रामपंचायत च सर्व दप्तर हस्तगत करून सविस्तर तपासणी करून लवकरच अहवाल सादर केला जाईल असे चौकशी अधिकार्यांनी तक्रारदारांना सांगितले होते.

मात्र या गोष्टी ला दोन महिने लोटूनही चौकशी अहवाल सादर झालेला नसल्याचे तक्रारदारांनी सांगितले आहे. या बाबतीत



चौकशी अधिकारी चव्हाण यांना वेळोवेळी विचारणा केल्यास चौकशी अधिकारी चव्हाण हे दोन दिवसात देतो, चार दिवसात देतो अशी केवळ आश्वासने देत चालढकल करीत आलेत असे आरोप तक्रारदार यांच्या कडून करण्यात येत आहे. या चालढकल काळात संबंधित ग्रामपंचायत अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून दप्तरातील नोंदींमध्ये फेरफार झाल्याची शक्यता तक्रारदारांनी व्यक्त केली असून, तपासात होत असलेला विलंब ही संशयास्पद बाब असल्याचेही तक्रारदार व ग्रामस्थांचे मत आहे.

**चौकशी अधिकाऱ्यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात?**

चौकशी आदेश असूनही दोन महिन्यांपर्यंत अहवाल न येणे, तक्रारदारांना मिळणारी विलंबित उत्तरे आणि प्रकरणात गती नसल्यामुळे विस्तार अधिकारी चव्हाण यांच्या भूमिकेविषयीही प्रश्न उपस्थित होत आहेत.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, चौकशी अहवालाला विलंब होत आहे का? भ्रष्टाचाराच्या आरोपांना आडोसा मिळत आहे का? संबंधितांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न सुरू आहे का?

असे प्रश्न तक्रारदार व ग्रामस्थांतून पुढे येत आहेत. कुक्कडगाव ग्रामपंचायतीतील कामांतील कथित अनियमितता, निधी गैरव्यवहार आणि ग्रामसभा न घेणे अशा मुद्द्यांवर दाखल तक्रारींची चौकशी अद्यापही अपूर्ण असल्याने प्रकरण धूसर होत चालले आहे.

तक्रारदारांनी तात्काळ चौकशी अहवाल जाहीर करून संबंधितांवर कार्यवाही करण्याची मागणी केली असून, विलंबाबाबत उच्चस्तरीय चौकशीची मागणीही करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# आंदोलनातील शिक्षकांवरील वेतनकपात आदेश तात्काळ रद्द करा

## शेख अब्दुल रहीमची मागणी

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** राज्यातील शिक्षकांनी दि. ५ डिसेंबर २०२५ रोजी टीईटी सक्ती रद्द करावी तसेच १५ मार्च २०२४ च्या संचमान्यता निकषांतील त्रुटी दुरुस्त कराव्यात या दोन महत्त्वपूर्ण मुद्द्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शांत, शिस्तबद्ध व कायद्याचे पालन करत आंदोलन केले होते. या आंदोलनादरम्यान कोणताही गोंधळ, अनुशासनभंग किंवा अवांछित प्रकार घडलेला नसतानाही शिक्षण संचालक कार्यालयाने आंदोलनात सहभागी शिक्षकांची १ दिवसाची वेतनकपात करण्याचे आदेश जारी केले आहेत.

ही कारवाई नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांना धरून नसून शिक्षकांच्या घटनात्मक हक्कांवर आघात करणारी आहे, असे मत महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनेचे राज्य प्रवक्ते आणि हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम यांनी व्यक्त केले. आंदोलनाचा हेतू शासनाशी संवाद साधणे व शिक्षण क्षेत्रातील अडचणी अधोरेखित करणे हा असून, दंडात्मक पावले उचलणे अनुचित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



या संदर्भात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि शालेय शिक्षणमंत्री यांना पाठवलेल्या निवेदनात खालील मागण्या करण्यात आल्या आहेत:

५ डिसेंबरच्या आंदोलनासंदर्भातील १ दिवस वेतनकपात आदेश तात्काळ रद्द करून त्या दिवसाची किरकोळ रजा मंजूर करण्याचे निर्देश शिक्षण संचालकांना द्यावेत.

टीईटी सक्ती व संचमान्यता निकषातील त्रुटींवर शिक्षक संघटनांशी सकारात्मक, सर्वसमावेशक संवाद आयोजित करावा.

शिक्षकांवरील भविष्यातील प्रशासकीय कारवाईपूर्वी सल्लामसलत व योग्य प्रक्रिया पालनाचे स्पष्ट निर्देश संबंधित विभागास द्यावेत.

राज्यातील शिक्षणव्यवस्था भक्कम ठेवण्यासाठी शिक्षकांचा विश्वास आणि मनोबल टिकून राहणे अत्यावश्यक असल्याचे अब्दुल रहीम यांनी नमूद केले. शिक्षकांच्या न्याय्य मागण्यांवर संवेदनशीलतेने विचार करून योग्य निर्णय घेणे हेच शासनाच्या हिताचे असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

# टीईटी परीक्षा सेवेत कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना अनिवार्य करण्याचा घाट का ? - विनोद कळंबे

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** सेवेत प्रविष्ट होण्यासाठी असणारी टीईटी परीक्षा सक्ती सेवेत कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना अनिवार्य करण्याचा घाट घालून राज्यातील अनेक शिक्षकांना सेवेतून मुक्त करण्याच्या राज्यकर्त्यांचा डाव आखला जात असल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे जाफराबाद तालुकाध्यक्ष विनोद कळंबे यांनी केला आहे.याविषयी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात श्री कळंबे यांनी म्हटले आहे की न्यायालयाच्या आडून शिक्षकांच्या मालगुटीवर टीईटीचे भूत बसविण्यात येत असून २५/३० वर्षांपूर्वी सेवेत प्रविष्ट झालेल्या शिक्षकांना टीईटी अनिवार्य करण्याचा घाट का घातला जातोय हे न लगडणारे कोडे आहे. विशेष म्हणजे कोणत्या कर्मचारी संवर्गासाठी अशा पद्धतीची परीक्षा अनिवार्य करण्यात आलेली नाही. मग शिक्षकांसाठी हा अट्टाहास का असा संतप्त सवाल त्यांनी केला आहे.महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे आधारस्तंभ संभाजी तात्या थोरात, राज्याध्यक्ष बाळासाहेब मारणे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण राज्यातील खासदार यांना निवेदन देऊन याविषयी त्यांना या प्रश्न संसदेत आवाज उठविण्या बाबत आग्रह करण्यात येणार आहे. राज्यातील सर्व आमदारांना देखील निवेदन देऊन याविषयी विधिमंडळात आवाज उठविण्याचा आग्रह धरण्यात



येणार आहे. राज्य लाखोच्या संख्येने असणाऱ्या शिक्षक वर्गाला जाणीवपूर्वक डिवचण्याचा प्रयत्न होत असून आगामी पदवीधर, शिक्षक तसेच जिल्हा परिषद महानगरपालिका निवडणुकीत शिक्षक आपले उपद्रव मूल्य नक्कीच दाखवतील असेही त्यांनी म्हटले आहे.

# भीक मागण्यास बंदी येणार

**मुंबई -** राज्यात आता लवकरच भीक मागण्यास बंदी घालण्यात येणार आहे. विधानसभेपाठोपाठ आता विधान परिषदेमध्येही महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध विधेयक मंजूर करण्यात आलं. परंतु सभागृहातील अनेक सदस्य असमाधानी असताना गोंधळाच्या स्थितीत हे विधेयक मंजूर करण्यात आलं. त्यामुळे तालिका सभापती नीलम गोऱ्हे, शिवसेनेच्या आमदार मनिषा कायंदे, राष्ट्रवादीचे अमोल मिटकरा यांच्यासह अनेकांनी नाराजी व्यक्त केली. विधान परिषदेत हे विधेयक मंजूर झाल्यानंतर आता सभापतींच्या दालनात शनिवारी बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे.

# संस्कार प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांनी घेतली भूजल सर्वेक्षणाची माहिती

**जालना । प्रतिनिधी -** जालना येथील संस्कार प्रबोधिनी माध्यमिक विद्यालयातील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी भूजल सर्वेक्षण आणि भू विज्ञानाची माहिती जाणून घेतली. यात इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांची क्षेत्रभेटी तून भूजल सर्वेक्षण आणि भूविज्ञान विभागात जाऊन पाण्याचा स्त्रोत त्याच प्रमाणे जमिनीतील भूगर्भातील १५० फुटापर्यंत चे पाणी माणसास पिण्यास चालते. पाण्याच्या पातळीचे मोजमाप कसे करतात.पिण्याच्या पाण्यात क्षार किती असवा इत्यादी महिती विद्यार्थ्यांनी जाणून घेतली.सहाय्यक भूवैज्ञानिक गिरीधर, डॉ. कृष्णा देशपांडे, विभुते,राहुल भवाळ,राजश्री घाटोळे,गणेश शेळके, शहाजी काष्टे,काळे




आदींनी विद्यार्थ्यांना पाणी,भूगर्भा संदर्भात मार्गदर्शन केले. हे क्षेत्रभेटीचे आयोजन वर्गशिक्षक किरण धुळे,राहुल घोलप यांनी केले होते. या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष सुरेश कुलकर्णी विजय देशमुख विनायकराव देशपांडे,प्रा. केशरसिंह बगेरिया,भास्करराव काळे, डॉ.दीपक मंत्री,डॉ.जुगल किशोर भाला मुख्याध्यापक ईश्वर वाघ व सुजाण पालक आदींनी कौतुक केले.

# सहज व सोप्या भाषेत संविधानाची माहिती पुस्तक स्वरूपात उपलब्ध - राज्यपाल आचार्य देवव्रत

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भाषणावर आधारित 'भारतीय संविधानाची अमृतमहोत्सवी वाटचाल' या पुस्तकाचे प्रकाशन

**नागपूर । प्रतिनिधी -** नागरिकांना त्यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या समजावून सांगण्यासाठी अत्यंत सुंदर अशी संविधानिक चौकट भारतीय संविधानाने आखून दिलेली आहे. बंधुत्व आणि लोकशाहीचा भाव संविधानात आहे. संविधानाने समाजाला, राष्ट्राला जोडण्याचे काम केले. सहज व सोप्या भाषेत संविधानाची माहिती पुस्तक स्वरूपात उपलब्ध होत असल्याचे प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज येथे केले.

भारतीय गणराज्याच्या ७५ व्या वर्षपूर्तीनिमित्त 'भारतीय संविधानाची अमृतमहोत्सवी वाटचाल' या विषयावर २६ मार्च २०२५ रोजी विधानसभेत झालेल्या चर्चेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तरादाखल केलेले भाषण पुस्तक स्वरूपात आज राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते लोकभवन येथे प्रकाशित करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र विधिमंडळाच्या वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे या पुस्तकाचे संकलन आणि संपादन करण्यात आले आहे.

पुस्तक प्रकाशनप्रसंगी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील तसेच मंत्रिमंडळ व विधिमंडळ सदस्य उपस्थित होते.

राजभवनचे नामकरण लोकभवन झाले आहे, याचा आनंद आहे. आज भारत जगातील दुसरी अर्थव्यवस्था म्हणून उदयास येत आहे. संविधानाच्या मार्गदर्शक तत्त्वांमुळे आपला देश आता वेगाने विकसित होत आहे. संविधानातील बारकावे या पुस्तकातून जाणून घेता येईल. इतर भाषेतही या पुस्तकाचा अनुवाद व्हावा, असे राज्यपाल आचार्य देवव्रत म्हणाले.

**सर्वांगीण विचार करून संविधानाची निर्मिती - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

भारतीय संविधान हे जगातील एक सर्वोत्तम संविधान आहे. भारत स्वतंत्र झाला तेव्हा विविध संस्थानांमध्ये विभाजित होता. देशात सांस्कृतिक ऐक्य होते, मात्र राजकीय ऐक्य नव्हते. त्यामुळे सर्वांना एकत्र करत सर्वांगीण विचार करून संविधान तयार करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान मूल्य जपणाऱ्या विविध देशाच्या लोकशाहीचा अभ्यास केला, आणि आपल्या देशातील शाश्वत मूल्यांवर आधारित संविधान निर्मिती केली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुस्तक प्रकाशनप्रसंगी म्हणाले.

संविधानाने सर्वांना संधीची समानता दिली. संविधानिक व्यवस्था आपल्याकडे कुणीही केंद्रीत करू शकत नाही. देशातील अनेक खटल्यांनी संविधानाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. संसद आणि न्यायालयाचे अधिकार परिभाषित केले आहेत. पुस्तक वाचल्यानंतर सर्वसामान्य माणूस देखील भारताचे संविधान व त्याची मूल्ये समजू शकेल, असे ते म्हणाले. यापूर्वी 'बजेट कसे असावे' हे पुस्तक अतिशय सोप्या भाषेत लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. संविधान हे सोपे आहे, क्लिष्ट नाही हे सांगण्याचा पुस्तकाच्या माध्यमातून प्रयत्न केला. आता ते पुस्तक स्वरूपात उपलब्ध होणार असल्याचा आनंद असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले.

**इतर भाषेतही पुस्तकाचा अनुवाद व्हावा - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

संविधानाची माहिती अत्यंत सोप्या भाषेत नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी हे पुस्तक निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. अत्यंत अभ्यासपूर्ण भाषणावर आधारित हे पुस्तक अत्यंत सोप्या भाषेत संविधान सर्वांपर्यंत पोहोचवेल. विधिमंडळाची गौरवशाली परंपरा आहे. ही परंपरा अनेक वर्षापासून जपण्यात आली आहे.

अनेक देशांकडे आपआपले संविधान आहे. मात्र आपले संविधान हे समाजाचा सर्वागीण विचार करणारे आहे. या पुस्तकाचा अनुवाद इतर भाषेतही व्हावा, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले.

श्री.फडणवीस हे संविधान समजून घेणारे आणि पुस्तक रूपात मांडणारे मुख्यमंत्री आहेत. सर्वच विषयांचा त्यांचा सखोल अभ्यास असतो. बजेटवर त्यांनी अभ्यासपूर्ण पुस्तक लिहिले आहे. आज प्रकाशित होणारे पुस्तक अनेकांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. राज्यशास्त्राचे विद्यार्थी, लोकनेते, नागरिक सर्वांनी हे पुस्तक संग्रही ठेवावे, असेच आहे.

**संविधानिक विचार सोप्या शब्दात पोहोचतील - विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर**

जनसामान्यांना सोप्या शब्दात



संविधानाची माहिती व्हावी, यासाठी मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या भाषणाची पुस्तक रूपात ओळख होण्याची गरज होती. या पुस्तकाच्या माध्यमातून सर्वसामान्यांपर्यंत संविधानिक विचार सोप्या शब्दात पोहोचतील, असा विश्वास विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी आपल्या प्रस्तावनेत व्यक्त केला. या पुस्तकातून संविधानातील तरतुदींची माहिती मिळेल, असे ते पुढे म्हणाले.

विधानसभेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी आभार मानले. लोकभवन नामकरण झाल्यानंतर संविधानावर आधारित पुस्तक प्रकाशन सोहळा लोकभवन येथे आयोजित करण्यात आला आहे. शाळा, महाविद्यालये, राज्यशास्त्राचा अभ्यासकांना हे पुस्तक उपयुक्त ठरेल. अतिशय सोप्या भाषेत हा संदर्भग्रंथ सर्वांना निश्चित उपयोगी ठरेल, असे प्रा.शिंदे यावेळी म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या या पुस्तकाची प्रत विधिमंडळाच्या ु.श्रीेंस.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध असणार आहे.

कार्यक्रमादरम्यान केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचा शुभेच्छा संदेश वाचून दाखविण्यात आला. तसेच मुख्यमंत्र्यांच्या आतापर्यंतची वाटचाल अधोरेखित करणारी ध्वनिचित्रफित यावेळी दाखविण्यात आली.

# बदलत्या शिक्षण धोरणानुसार अपडेट व अपग्रेड होणे महत्त्वाचे- डॉ. विठ्ठल पवार



**जालना | प्रतिनिधी -** जालना शहराजवळील इंदापूर येथील श्री रेणुका देवी माध्यमिक विद्यालय सन २००४ मधील दहावीच्या पहिल्या बॅचच्या विद्यार्थ्यांचा मेळावा उत्साहात पार पडला. त्यात सर्वांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला.

जुन्या आठवणींना उजाळा देण्यासह शाळा व शिक्षकाप्रती कृतज्ञता,आपल्या वर्गमित्राचे काय चालू आहे व पुन्हा त्यांना त्या शालेय आठवणीमध्ये नेण्यासाठी हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री. पाटील, मुख्याध्यापक रमेश पवार होते. माजी विद्यार्थ्यांनी त्या काळातील शालेय जीवनाच्या आठवणींना उजाळा देताना या शाळेने आम्हाला ज्ञानरूपी जी शिदोरी दिलेली आहे, त्या जोरावरच आज आम्ही आमचं व्यवसायिक, सामाजिक व कौटुंबिक जीवन एक उत्तम नागरिकाप्रमाणे व्यतीत करत आहोत. आम्हाला ज्या शाळेने व शिक्षकांने घडवलं, त्या शाळेप्रती व शिक्षकाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा मेळावा आयोजित केल्याचे स्पष्ट केले. अध्यक्षीय भाषणातून डॉ. विठ्ठल पवार यांनी शाळा सुरू करण्याचामागचा हेतू विशद केला. चार भिंती म्हणजे शाळा नव्हे तर या शाळेतून ज्ञानदानाचे कार्य अविरत चालावं व त्यातून उत्तम नागरिक घडावेत, बाहेर पडल्यानंतर मी आणि माझं कुटुंब न बघता व्यापक दृष्टिकोन ठेवून, आमच्यावरती कुटुंब, समाज संस्कृती व राष्ट्राचं ऋण आहे आणि ते ऋण मी जर फेडले नाही तर मी कृतघ्न म्हटला जाईल. आई वडील, समाज, संस्कृती व राष्ट्राचे ऋण फेडणारे विद्यार्थी या ठिकाणी घडले पाहिजेत, असे ते म्हणाले.आज शिक्षण पद्धती बदलली असून, बदललेल्या शैक्षणिक धोरणानुसार आपण अपडेट आणि अपग्रेड होणं हे अत्यंत महत्त्वाचा आहे, त्या दृष्टिकोनातून माजी विद्यार्थ्यांनी अशा अमूल्य सूचना व सहकार्य करावे अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली व त्यांच्या भावी आयुष्याला शुभेच्छा व्यक्त केल्या. माजी विद्यार्थी त्यांच्या शालेय जीवनाचा आठवणीमध्ये रममाण झाले होते व मैत्रीचा धागा शेवटपर्यंत सुखदुःखामध्ये टिकून राहावा, अशी अपेक्षा सर्वांनी व्यक्त केली.

याप्रसंगी शिक्षक सर्वश्री गायकवाड, पाचरणे, मिरगे, जोशी, धोंगडे, जाधव, राऊत कायंदे, इंगळे यांचा सत्कार करून विद्यार्थ्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. राऊत यांनी केले तर आभार प्रदर्शन जोशी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पंढरीनाथ घोंगे, मनोज चांदगुडे, सदाशिव क्षीरसागर, शंकर परमेश्वर व अंगद गोडबोले यांनी विशेष परिश्रम घेतले.

# रवींद्र ढगे यांची महाराष्ट्र संघाच्या प्रशिक्षक पदी नियुक्ती

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** महाराष्ट्र राज्य कबड्डी असोशियन च्या मान्यतेने व पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या वतीने पुणे येथे आयोजित करण्यात येणाऱ्या कुमार कुमारी गटराज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या कुमार मुली गट निवड समितीवर मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली


तसेच क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या वतीने दहा ते बारा डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या राज्यस्तर शालेय सतरा वर्ष कबड्डी स्पर्धे साठी निवड समिती सदस्य म्हणून निवड करण्यात आलेली आहे

पुणे येथे २५ ते २९ नोव्हेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तर स्पर्धेमधून महाराष्ट्र राज्याचा कुमार कुमारी मुलींचा संघ निवडण्यात आला आहे या संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून जिल्हा परिषद निवासी क्रीडा प्रबोधनी जालना येथे कार्यरत असलेले रवींद्र प्रल्हाद ढगे सुवर्णपदक विजेता खेळाडू यांची नियुक्ती करण्यात आली



ही राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा डमडम कोलकाता येथे २५ डिसेंबर ते २८ डिसेंबर या कालावधीत होणार आहे या उत्तुंग यशाबद्दल महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे सर कार्यवाह बाबुराव चांदेरे खजिनदार मंगल पांडे तसेच जालना जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या अध्यक्षा माधवी काळे उपाध्यक्ष डॉक्टर देवेश पात्रीकर जिल्हा सचिव प्रशांत तेलगड प्राध्यापक सोपानराव तेलगढ नंदकिशोर खर्डेकर क्रीडा मार्गदर्शक महेश खर्डेकर डॉक्टर भुजंग डावकर डॉक्टर प्रशांत तर क्रीडा शिक्षक संजय येळवंते बाबासाहेब मंडळे राहुल वाहुळे सुंदर थोरात संतोष नागवे बीजे पाटोळे दिनेश वाघ विठ्ठल दिवटे देविदास भोजने अजय काळवणे वाले यांनी अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या

## नानासाहेब देशमुख (ढवळे) यांचे निधन



**जाफ्राबाद - तालुक्यातील** तोंडोळी येथील रहिवासी व मराविमंचे सेवानिवृत्त कर्मचारी नानासाहेब भुंजंगराव देशमुख - ढवळे ( वय ८५ ) यांचे १० डिसेंबर रोजी पहाटे दीड वा.हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने राहत्या घरी निधन झाले. त्याच दिवशी दुपारनंतर त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी , दोन मुले व दोन मुली - जावई व नातवंडे असा परिवार आहे. जालना ज्येष्ठ नागरिक मंचचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ. रावसाहेब ढवळे यांचे ते थोरले बंधू होते.

# मानवाधिकार दिनानिमित्त पदवीधर संघर्ष समितीतर्फे ॲड महेश धन्नावत यांचा सत्कार



**जालना | प्रतिनिधी -** जागतिक मानवाधिकार दिनानिमित्त पदवीधर संघर्ष समितीच्या वतीने ॲड. महेश धन्नावत यांचा मानवाधिकार संरक्षण आणि सामाजिक कार्याबद्दल समितीचे पदाधिकारी श्याम सारस्वत आणि संतोष खंडेलवाल यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

ॲड. महेश धन्नावत आणि ड. अश्विनी धन्नावत या दांपत्याने मानवाधिकार आयोगाकडे केलेल्या यशस्वी पाठपुराव्यामुळे शहरातील अनेक प्रलंबित नागरी समस्या मार्गी लागल्या. यामध्ये गेल्या १८ महिन्यांहून अधिक काळ बंद असलेला मूर्ती बेस परिसरातील रस्त्याचा प्रश्न निकाली काढण्यात आला. त्यांच्याच प्रयत्नांमुळे शहरात स्वच्छतागृहांची उभारणी, स्वच्छतेचा प्रश्न, रस्त्यांची दुरुस्ती आणि भूमिगत गटार योजना यांसारखी महत्त्वपूर्ण कामे शक्य झाली. या कार्याची दखल घेऊन पदवीधर संघर्ष समितीने त्यांचा सन्मान केला.

याप्रसंगी बोलताना ड. महेश धन्नावत यांनी मानवाधिकार दिनाचे महत्त्व विषद केले. ते म्हणाले की, भारतात मानवाधिकारांच्या संरक्षणाची परंपरा प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात रयतेच्या हक्कांचे संरक्षण हे स्वराज्याचे मूळ धोरण होते. हाच वारसा पुढे चालवला जात आहे. नागरिकांच्या हक्कांसाठी अविरतपणे काम करत राहू, अशी ग्वाहीदेखील त्यांनी यावेळी दिली. ॲड. धन्नावत यांनी नागरिकांच्या हक्कांसाठी लढताना कायद्याचा प्रभावी वापर कसा करता येतो, हे आपल्या कार्यातून सिद्ध केले आहे, अशा भावना श्याम सारस्वत आणि संतोष खंडेलवाल यांनी व्यक्त केल्या.

# गोदावरी महाविद्यालयास 'बी प्लस' दर्जा

## प्राचार्य व समन्वयकांचा सत्कार

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** गोदावरी कला कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, अंबड या प्रतिष्ठित महाविद्यालयाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या अॅकॅडेमिक ग्रेड सिस्टिममध्ये 'बी प्लस' हा उल्लेखनीय दर्जा प्राप्त झाला आहे. या यशाचे औचित्य साधून महाविद्यालयात विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. या समारंभात प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार, छउ समन्वयक डॉ. सुनील जल्हारे आणि सहसमन्वयक डॉ. अमित राऊत यांचा प्राध्यापकांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्राध्यापक वर्ग, कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाविद्यालयाने अलीकडच्या काळात शैक्षणिक गुणवत्ता, नावीन्यपूर्ण अध्यापनपद्धती, विद्यार्थी-अनुकूल वातावरण, सामाजिक बांधिलकी आणि विविध क्रियाकलापांमधील सातत्यपूर्ण प्रगती यावर विशेष भर दिला. याच प्रयत्नांची दखल घेत विद्यापीठाने 'बी प्लस' असा मानांकन दर्जा प्रदान केला असून, हे महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रवासातील एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.



सत्कारप्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार यांनी सर्वांचे आभार मानले. त्यांनी सांगितले की, हा दर्जा हा केवळ माझा वा नॅक समितीचा नसून संपूर्ण महाविद्यालयीन परिवाराचे सामूहिक यश आहे. अध्यापन, संशोधन, सांस्कृतिक उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी अतोनात परिश्रम घेतले. यामुळेच आज आपल्याला हा सन्मान मिळाला आहे. पुढे बोलताना त्यांनी संस्थेची पुढील वाटचाल अधिक गुणवत्तापूर्ण, पारदर्शक आणि विकासाभिमुख करण्याचा निर्धार व्यक्त केला.

NC समन्वयक डॉ. सुनील जल्हारे आणि सहसमन्वयक डॉ. अमित राऊत यांनीही या यशात सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले. महाविद्यालयाच्या सर्व विभागांनी समन्वय साधत दस्तऐवजीकरण, मूल्यांकन, स्व-अभ्यास अहवाल तयारी आणि गुणवत्तावाढ प्रक्रियेत केलेल्या सहकार्याची त्यांनी विशेष प्रशंसा केली. त्यांनी भविष्यात आणखी उच्च श्रेणी मिळवण्याचा संकलपही व्यक्त केला.

विद्यार्थ्यांना उत्तम शैक्षणिक सुविधा, लायब्ररीचे आधुनिकीकरण, प्रयोगशाळांची सुधारणा, कौशल्यविकास उपक्रम, क्रीडा आणि सांस्कृतिक वातावरण यांचा सातत्याने विस्तार करण्याबाबत सर्वांनी एकमताने आश्वासने दिली.

संपूर्ण कार्यक्रम आनंदी, उत्साही आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. महाविद्यालयाला मिळालेला 'बी प्लस' दर्जा ही येथील शैक्षणिक निष्ठा, नियोजनबद्ध प्रयत्न आणि सातत्यपूर्ण गुणवत्तावाढ यांची पावती असल्याची सामूहिक भावना सर्वांनी यावेळी व्यक्त केली. महाविद्यालयाने पुढील काळात 'ए ग्रेड' मिळवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा निर्धारही व्यक्त केला. यावेळी प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्रे, प्रा. डॉ. मारोती तेगमपुरे, प्रा. डॉ. संतोष पवार, डॉ. चांगदेव मुंडे, डॉ. देविदास नरवडे, डॉ. दिलीप फोके, डॉ. रमेश वाघमारे, डॉ. रामराव राठोड डॉ. शिवदास पावरा, डॉ. रंजीता जाधव, डॉ. सुखलाल राठोड, बळीराम राठोड, स्मिता पवार, रमेश पवार आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# यशस्वी जीवना करिता श्री गुरूंची आवश्यकता - ह भ. प.पिंपळे महाराज

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** मानवाच्या यशस्वी जीवनाकरिता श्री गुरूंची नितांत आवश्यकता असते असे प्रतिपादन ह भ प नारायण पिंपळे गुरुजी यांनी श्री दत्तात्रेय भगवंत जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त खापरखेडा येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये केले.

श्री दत्तात्रय भगवंत जन्म सोहळा निमित्त अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे त्यामध्ये दिनांक १ डिसेंबर रोजी पिंपळे महाराजांची किर्तन रुपी सेवा झाली.

हेचि भक्ती हेचि ज्ञान, नये वृत्तीवरी मन!

या कीर्तन रुपी सेवेकरिता घेतलेल्या अभंगावर निरूपण करताना महाराज म्हणाले की आजच्या काळामध्ये खरी भक्ती कोणती आहे व खरं ज्ञान कोणतं आहे हे जर पाहायचं असेल तर त्यासाठी श्री गुरुंची नितांत आवश्यकता आहे श्री गुरु मिळाल्याशिवाय ते ज्ञान ती भक्ती कोणती श्रेष्ठ आहे ते कळत नाही.



परंतु त्याकरिता श्री गुरु मिळणे अत्यंत दुर्लभ आहे .

दुर्लभम त्रैमेव येत तह देवता नु ग्रह हेतुकम ,मनुष्यत्व मुमुक्षत्व, महापुरुषस संश्रेया.

म्हणजेच या जगामध्ये तीन गोष्टी अतिशय दुर्लभ आहेत त्या म्हणजे मनुष्य जन्म दुर्लभ आहे. मुमुक्षुत्व दुर्लभ आहे आणि महापुरुष म्हणजे संतांची संगत श्रीगुरुंची संगत अतिशय दुर्लभ आहे.

आपल्या अंतकरणातील मल विक्षेप दोष गेल्याच्या नंतर आवरण दोष घालवण्याकरता श्रीगुरु भेटणे गरजेचे आहे. ते भेटल्यानंतर मानवाचे जीवन निश्चित यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही .त्यामुळे श्री गुरूंची जीवनात नितांत गरज आहे.

या श्री गुरुदत्त जन्मोत्सव सोहळा आनंदाने यशस्वी करण्याकरिता प्रयत्न करणारे सर्व गावकरी मंडळी यावेळी उपस्थित होते. यावेळी गायनाचार्य (झी टॉकीज फेम) ह भ प अनिल महाराज देवडे, ह भ प विष्णु महाराज, ह.भ.प. वैभव महाराज सोनवणे, ह भ प मृदंगाचार्य शंकर महाराज, ह भ प कृष्णा महाराज मोहिते, ह भ प कैलास महाराज, ह भ प माधव महाराज व इतर सर्व गुरु मंडळी उपस्थित होते.

# सत्यशोधक विद्यालय येथे विज्ञान विषयाचे मार्गदर्शन पर तासिकेचे आयोजन

**विशाल देशमुख**

**टेभूर्णी -** मानव विकास व पुर्ननिर्माण संशोधन संस्था औरंगाबाद संचलित, सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव येथे दप्तर मुक्त शाळा अंतर्गत आज दिनांक २९ नोव्हेंबर २०२५ रोजी विज्ञान विषयाचे मार्गदर्शन करताना श्री.भरत कदम यांनी बोर्ड परीक्षे संदर्भात कोणती काळजी घेतली पाहिजे विद्यार्थ्यांनी शिकण्याच्या आणि अभ्यासक्रमाचे ३ प्रकार सांगितले. १. लक्ष्य,२.धैर्य,३. चूलबुल त्यानुसार त्यांनी स्वतः मध्ये सुधारणा करून म्हणजे अभ्यासक्रमाचा वेळापत्रक




करून विषयाचे नियोजन करावे व मंडळाच्या परीक्षेसाठी तयारी करावी व यश संपादित करावे. त्यांनी १० वी च्या विज्ञान विषयाच्या संदर्भातील संज्ञा कशा पाठ करून लक्षात ठेवाव्यात यासाठी काही ट्रिक्स सांगितल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचे रसायनशास्त्र विषयाचे प्रा. सुमित श्रीवास्तव यांनी परिश्रम घेतले.प्रमुख पाहुण्यांचे स्वागत विद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा.इफरोज पठाण यांनी केले व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.पांढरे यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य श्री.सुनीलजी वाकेकर तसेच संस्थेच्या सचिव श्रीमती जयश्रीताई बनकर यांचे मार्गदर्शन लाभले . कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.